वाहतूक नियंत्रण अधिसुचना – सुधारणा

क्र. पोउपा/शवाशा/प्रशा-१/ ८१ /२०१
पो. उपायुक्त शहर वाहतुक शाखा यांचे कार्यालय.
ठाणे. दि. २८/१२/२०२१.

विषय :— अधिसुचनेमध्ये सुधारणा होणेबाबत.

संदर्भ :— १) जा.क्र. विशा/एमआयडीसी/मनाई आदेश/४५२९/२०२१, दि. १९/११/२०२१.
२) OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८

*******

ज्याअर्थी, उल्हासनगर महानगरपालिका कडून वनशक्ती चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सर्वोच्च न्यायालयात दाखल सिव्हिल अपील क्र. १०५८२/२०१७ सुनावणी मध्ये आदेशित केल्याप्रमाणे मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखालील दि. ११/११/२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दि. २३/११/२०२० रोजी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

२) ज्याअर्थी, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सर्वोच्च न्यायालयास सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील मुद्दा क्र. ३ मधील उप मुद्दा क्र. ८ मध्ये औद्योगिक क्षेत्रामध्ये संध्याकाळी १८:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो सर्व प्रकारच्या टॅंकर वाहतुकीस बंदी घालण्याचे आश्वासित केले आहे.

३) ज्याअर्थी, संबंधित औद्योगिक क्षेत्रामध्ये संध्याकाळी १८:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो या कालावधीत टॅंकर मधून धोकादायक केमिकल वाहतूक घेवुन जाऊन ते रात्रीच्या वेळी नदीच्या पात्रात सोडले जातात. त्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होते. पाणी प्रदूषित झाल्याने लोकांचे आरोग्यास धोका निर्माण होतो आणि नदीतील जैव विविधतेवर परिणाम होतो. त्या अनुषंगाने तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना म्हणून खालील नमूद वेळेत डोंबिवली, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ व बदलापूर औद्योगिक क्षेत्रास उद्देशून टॅंकर बंदी बाबत आदेश काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

४) त्याअर्थी, मी जय जीत सिंह, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. –११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून यापुर्वीचे अधिसुचना क्र. OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. (प्रवेश बंदी वेळे व्यतिरिक्त इतर वेळेत प्रवेशासाठी संदर्भ क्रमांक ०२ अधिसुचनेतील प्रवेश तरतुदी खालील नमूद वाहन प्रकारासाठी व क्षेत्रासाठी लागू राहणार नाही.)

**प्रवेश बंद –** डोंबिवली, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ व बदलापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये संध्याकाळी १८:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो सर्व प्रकारच्या टॅंकर वाहतुकीस बंदी राहील.

२४.१२.२१

( जय जीत सिंह )
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

**प्रति,**

संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.
२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना रद्द केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत मा.सविनय सादर**

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, ठाणे शहर, नवी मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

पोलीस उप आयुक्त,
आ.गु.शा. व सायबर सेल, ठाणे
क्रमांक · ईमेल ०३/२०२२
३/१/२०२२